**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६/२०१८-१९/ 182 दिनांक: ७.०८.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. १६(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | मे.जय भारत सहकारी पाणी पुरवठा संस्था<br>मु.पो. शेडशाळ ता. शिरोळ<br>जि.कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय जयसिंगपूर | |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय कोल्हापूर यांच्या दिनांक २६.०४.२०१८ च्या आदेशाने व्यथीत होऊन, दाखल केलेली आहे.

थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार जय भारत सहकारी पाणी पुरवठा मर्यादित, ही एक सहकारी पाणी पुरवठा संस्था असून त्यास विवेकानंद सहकारी पाणी पुरवठा ग्राहक क्र. २५२९०९३०३०७८ व विवेकानंद सहकारी पाणी पुरवठा ग्राहक २५२९००३००१४९ आणि गणेश सहकारी पाणी पुरवठा संस्था, ग्राहक क्र. २५२७१९३०३०४७ या तीन पाणी पुरवठा संस्थांना , वि.प. विज वितरण कंपनीने कवठेगुलंद उपकेंद्रातून ११ के.व्ही. ची एक्सप्रेस फिडर DDF योजने खाली विज पुरवठा मंजूर केलेला आहे. तक्रारदारानी साधरण ३२ ते ३५ लाख रुपये खर्च करुन कवठेगुलद उपकेंद्रातून विज पुरवठा घेतलेला आहे व तो विज पुरवठा अद्यापी चालू आहे DDF योजने खाली एक्सप्रेस फिडर वरुन ज्या ग्राहकानी किंवा ग्राहकांच्या समुहाने विज पुरवठा यंत्रणा स्वःखर्चाने उभी करुन घेतला असल्यास त्या एक्सप्रेस फिडरवर इतर कोणत्याही नवीन ग्राहकाला विज पुरवठा देता येत नाही अशी कायदयाची तरतूद आणि विज आयोगाच्या निरनिराळया आदेशामध्ये स्पष्ट केले असताना देखिल अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी श्री महादेव स्वामी सहकारी पाणीपुरवठा संस्था, शेडशाळ ता. शिरोळ जि. कोल्हापूर यांना हया DDF लाईनवर Tapping घेऊन स्वःखर्चाने इन्फ्रास्ट्रक्चर उभे करुन विज जोडणी घेण्याकरीता पत्र क्र. SE(KC)/T/HT/LIS/Shri Mahadev SPPM/५११४ व ५११५, दिनांक २९.०६.२०१६ च्या पत्रा अन्वये हमी पत्रास अधिन राहण्याच्या अटीवर मंजूरी दिलेली आहे. तक्रारदाराची तक्रार अशी आहे की ही मंजूरी देताना सदर DDF लाईनवरील मुळ ग्राहक म्हणजे तक्रारदार व इतर तीन सहकारी पाणी पुरवठा संस्था यांची कोणतीही परवानगी विज वितरण कंपनीने किंवा सदर नवीन ग्राहकांने घेतलेली नाही. विज वितरण कंपनीने सदर महादेव स्वामी सहकारी पाणी संस्थेकडून नोटरी समोर प्रतिज्ञापत्र वजा काही तरी कागदपत्रे, करुन घेऊन त्यास विज पुरवठा मंजूर केला असल्याचे दिसते. सदरचा विज पुरवठा बेकायदेशीररित्या मंजूर केलेला आहे. वास्तविक मा.राज्य आयोगाने केस क्र. ५६/२००७ मधील दिनांक १६.०२.२००८ रोजी च्या आपल्या आदेशाने हया बाबतील कायदयाची स्थिती आणि मार्गदर्शक तत्वे नमूद केलेली आहे. तसेच केस १४८/२०११ या केस मधील दिनांक ०५.१.२०१२ आणि केस ३६/२०१२ मधील दिनांक २३.०११.२०१२ रोजीच्या आदेशात देखिल मा.राज्य आयोगाने हयाबाबत, वेळोवेळी आदेश पारित केलेले आहेत या सर्व आदेशांचे यथायोग्य पालन न करता अधीक्षक अभियंता (कोमं) कोल्हापूर यांनी महादेव स्वामी पाणी पुरवठा संस्था सदर एक्सप्रेस फिडर वरुन बेकायदेशीर विज पुरवठा मंजूर केलेला आहे सबब तक्रारदाराच्या संमती शिवाय सदर DDF एक्सप्रेस फिडर लाईनवर कोणास ही नवीन विजपुरवठा करु नये असा आदेश मिळण्याकरता तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे केस दाखल केली असता दिनांक २६.०४.२०१८ चे आदेशाने कक्षाने महादेवस्वामी पाणी पुरवठा यांना मंजूर झालेल्या विज पुरवठयाबाबत दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठस्तर) यांचे कोर्टात दावा प्रलंबित असल्याने महादेव पाणी पुरवठा यांचे कनेक्शन प्रलंबित होते तथापि पत्र क्र. अअ/कोमं/मां/उ.का.अ/१७३० दिनांक १७.०२.२०१८ अन्वये मंजूर पत्राची वैधता कालावधी संपुष्टात आला असल्याने नवीन कनेक्शन घेते वेळी DDF फिडर धारकांची संमती घेण्याच्या अटीवर महादेव स्वामी पाणी पुरवठा संस्थेस कळविण्यात आलेल्या कारणावरुन निकाली काढलेली आहे. अशा कथनावरुन तक्रारदाराने DDF फिडरवर महादेव स्वामी पाणी पुरवठा यांना Tapping करुन विजपुरवठा मंजूर करणे व त्यास DDF म्हणून संबोधणे ही प्रतिवादी यांची कृती बेकादेशीर जाहीर होऊन मिळावे. तसेच महादेव स्वामी पाणी पुरवठा यांची मंजूरी कालावधी संपूष्टात आला असून नवीन फिडरद्वारे संमती सादर करणे आवश्यक असल्याबद्दल सदर पाणी पुरवठा संस्थेस कायदेशीररित्या कळविलेले असे जाहीर करुन मिळावे आणि तक्रारदाराच्या DDF एक्सप्रेस फिडर वरुन सदर संस्थेस विजपुरवठा बेकायदेशीरित्या मंजूर केल्यामुळे तक्रारदारास झालेल्या मानसिक त्रासापोटी व त्यासाठी करावयास लागलेल्या कोर्ट खर्चापोटी ,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदाराना विज वितरण कंपनीने भरपाई दाखल रक्कम रु. १०,०००/- देण्याचा आदेश पारित करावा अशी मागणी केलेली आहे.

सदर प्रकरणाची नोटीस बजावणी झाल्यानंतर वि.प. कंपनीने या प्रकरणी हजर होऊन खालील प्रमाणे आपले म्हणणे मांडलेले आहे.

१. ग्राहकाचा अर्ज दिनांक २६.१२.२०१४
२. उपविभाग शिरोळ येथून अंदाजपत्रक ११०९ अन्वये दिनांक १७.०१.२०१५ रोजी विभागीय कार्यालय जयसिंगपूर येथे पाठविले.
३. विभागीय कार्यालय, जयसिंगपूर ३४० अन्वये दिनांक २२.०१.२०१५ रोजी मंडल कार्यालय कोल्हापूर यांचेकडे पाठविले.
४. मंडल कार्यालय पत्र क्र. SE/(KC)/DYEE/१०८३ दिनांक ०६.०२.२०१५ त्रुटी
   १. ११ के.व्ही. विजय गणेश फिडर वरील इतर ग्राहकांचे संमतीपत्र जोडले नसलेबाबत कळविले होते. त्यानुसार उपविभाग शिरोळ कडून पत्र क्र. ३८८ दिनांक ०६.०३.२०१५ मे. महादेव स्वामी सहकारी पाणी पुरवठा यांना संमतीपत्र जमा करणे कामी कळविले होते.

१. ११ के.व्ही. विजय गणेश फिडरची माहिती

| | |
|---|---|
| १.उपकेंद्र नाव | ३३/११ के.व्ही. कवठेगुलंद उपकेंद्र |
| २.फिडरचे नाव | ११ के.व्ही. विजय गणेश एक्सप्रेस फिडर |
| ३. ठेकेदाराचे नाव | मे. श्रीयश इलेक्ट्रीकल्स, कुरुंदवाड |
| ४. स्कीमचे नाव | DDF |
| ५.मंजूरी क्रमांक( अंदाजपत्रक) | KPC/T/AE-I/२७६८ दि. २४.०४.२००९ |
| ६. ग्राहकाचे नाव | मे. जय भारत सह. पाणी पुरवठा मर्या. वगैरे २ मौजे शेडशाळ |
| ७.अंदाजपत्रक रक्कम | रु. २९,८२,२३४/- |
| ८. १.३ % सुपरव्हीजन चार्जेस | रु. ३८,७६९/- |
| ९. ११ के.व्ही. लाईन | ८ कि.मी. |
| १०. ११. के.व्ही. Bay | १ No. |
| ११. फिडर कार्यान्वित दिनांक | ११.०६.२००९ |

५. उपविभाग शिरोळ कडून पुन्हा पत्र क्र. २०३१ दि. २६.१०.२०१५ नुसार ११ के.व्ही. विजय गणेश फिडरवरील सर्व ग्राहकांची माहिती तसेच पत्र क्र. ४२७ दि. २२.०२.२०१६ नुसार पुन्हा संमतीपत्र देणेकामी कळविले होते. परंतु मे. महादेव स्वामी पाणी पुरवठा यानी ११ के.व्ही. विजय गणेश फिडर वरील ग्राहकांची संमतीपत्र सादर केली नाहीत.

६. SE/(KC)/T/HT/LIS/Shri Mahadev SPPM/५११४ व ५११५ दिनांक २९.०६.२०१६ नुसार हमीपत्रास अधीन राहून मंजूरीबाबतचे पत्र दिनांक १२.०७.२०१६ रोजी प्राप्त झाले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

७ स्पेशल केस क्र. ७/२०१७ नुसार मे. महादेव स्वामी पाणी पुरवठा यांचे मंजूर कामाकरिता मनाईचा आदेश असल्यामुळे व सदर बाबतीत में. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन यांचे कोर्टात कोर्ट केस सुरु असलेने मे. महादेव स्वामी पाणीपुरवठा यांचे कनेक्शन प्रलंबित होते. तथापि पत्र क्र. अअ/कोमं/मां/उपकाअ/१७३० दिनांक १७.०२.२०१८ अन्वये मंजूरी पत्राची वैधता कालावधी संपुष्टात आला असल्याने पुर्ण मंजूरी करिता अर्ज योग्य /आवश्यक कागदपत्रासह तसेच मे. जय भारत सह. पाणी पुरवठा मर्या. वगैरे २, मौजे शेडशाळ यांचे ना हरकत प्रमाणपत्रासह मंडल कार्यालय कोल्हापूर येथे सादर करणेबाबतच्या पत्राची प्रत या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२०१८ रोजी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारान तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे हे हजर होते तर वि.प. कंपनी तर्फे श्री मकरंद दे. आवळेकर, कार्यकारी अभियंता जयसिंगपूर विभाग हे हजर होते. उभयतांनी आपआपल्या पक्ष कथनाप्रमाणे युक्तीवाद या मंचापुढे केला.

आमच्या निष्कर्षाकरता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|
| १. तक्रारदाराच्या एक्सप्रेस DDF फिडर लाईनवरुन महादेव स्वामी पाणी पुरवठा संस्था यांना बेकायदेशीररित्या पत्र क्र. SE(KC)/T/HT/LIS/Shri Mahadev SPPM/५११४ & ५११५ दिनांक २९.०६.२०१६ च्या पत्राने विज पुरवठा मंजूर करण्यात आला हे तक्रारदाराने शाबीत केले आहे काय? | होय |
| २. प्रस्तुत तक्रारीस स्पेशल दिवाणी मुकदमा क्र.७/२०१७ चा बाध येतो काय? | नाही |
| ३. तक्रारदारास मागणी केलेल्याप्रमाणे नुकसान भरपाई रक्कम रु. १०,०००/- मिळण्यास तक्रारदार पात्र आहे काय? | नाही |
| ४. अंतिम आदेश? | तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे |

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणे

**मुद्दा क्रमांक १ ते ३:-** सर्व प्रथम वि.प. कंपनी तर्फे उपस्थित करण्यात आलेल्या, प्रस्तुत तक्रारीच्या संदर्भात कायदयाच्या मुद्दयाबाबत विवेचन करणे योग्य राहिल. वि.प.कंपनी तर्फे, दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठस्तर) , यांच्या न्यायालयात स्पेशल दिवाणी मुकादमा ७/२०१७, हा या तक्रार अर्जातील नमूद वादाकरिताच दाखल असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युतलोकपाल ) विनियम २००६ च्या कलम ६.७.४ अन्वये या मंचापुढे प्रस्तुतची तक्रार चालू शकत नाही व हे मंच ही तक्रार दाखल करुन घेऊच शकत नाही असे म्हणणे मांडण्यात आले. सदर विनियमातील कलम ६.७.४ मध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे."जर कोणतेही न्यायालय न्यायाधिकरण लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांच्यापुढे त्याच गाऱ्हाण्याच्या संदर्भात ग्राहकाचे अभिवेदन प्रलंबित आहे किंवा अशा कोणत्याही न्यायालय न्यायाधिकरण , लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांनी यापूर्वीच डिक्री किंवा निवाडा किंवा अंतिम आदेश दिलेला आहे."

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

या तक्रार अर्जात नमूद केलेल्या वादाकरता तक्रारदारांनी जयसिंगपूर दिवाणी न्यायालयात स्पेशल दिवाणी मुकदमा क्र. ७/२०१७ दाखल केलेला आहे ही बाब तक्रारदारानीच हया मंचापुढे मांडलेली असून त्या दाव्यातील आपल्या पक्ष कथनाच्या (Plaint) व तूर्तातूर्त मनाईच्या अर्जाची साधी नक्कल या कामी हजर केलेली आहे तथापि तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे यांनी प्रस्तुतची तक्रार दाखल करण्यापूर्वीच दिवाणी न्यायालयाची परवानगी घेऊन सदरचा दावा , प्रस्तुत मंचाकडे तक्रार दाखल करण्याकरिता विना अट परत घेतला असून तो दावा कोर्टाने काढून टाकलेला आहे आणि तो दावा प्रलंबित नाही असे प्रतिपादन या मंचासमोर आपल्या युक्तिवादा दरम्यान केलेले आहे तसेच सदर दावा परत घेण्याकरिता दिवाणी दाव्यात वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या पुरसिसची व दावा काढून टाकल्याचा आदेश असलेली वाद पत्राची साधी नक्कल या मंचाला आपल्या युक्तिवादा दरम्यान दाखवली सदर पुरसिस आणि आदेशाची सही शिक्काची नक्कल या मंचासमोर दाखल करण्याची सूचना या हया मंचाने दिली असता श्री खापरे यांनी नक्कल हजर करतो असे अभिवचन दिले परंतु तशी नक्कल या मंचासमोर अद्यापपर्यन्त दाखल केलेली नाही परंतु सदरचा दावा आज रोजी प्रलंबित नाही किंवा त्या दाव्याचा कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही याची खात्री पटलेली आहे.त्यामुळे प्रस्तुत तक्रार दाखल करते समयी सदरचा दावा प्रलंबित नव्हता म्हणून वरनमुद केलेल्या ६.७.४ या कलमाचा वाद प्रस्तुत प्रकरणात येत नाही असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्र. २ चे उत्तर आम्ही नकारार्थी दिलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात तक्रारदारांना DDF योजने खाली एक्सप्रेस फिडर वरुन इतर तीन पाणीपुरवठा संस्था सोबत विज पुरवठा करण्यात आलेला आहे व त्याकरिता लागणारी पूर्ण यंत्रणा तक्रारदार व इतर पाणी पुरवठा संस्था यांनी स्व:खर्चाने उभारलेली आहे ही बाब वि.प. कंपनीने मान्य केलेली आहे तसेच वि.प. कंपनीने हे देखिल मान्य केलेले आहे सदर DDF एक्सप्रेस फिडर वरुन, पत्र क्र. SE(KC)/T/HT/LIS/Shri Mahadev SPPM/५११४ & ५११५ दिनांक २९.०६.२०१६ अन्वये महादेव स्वामी पाणी पुरवठा संस्थेस विज पुरवठा मंजूर करण्यात आलेला होता ती बाब देखिल वि.प. कंपनीने मान्य केलेली आहे. तथापि वितरण कंपनीचे पुढे असेही म्हणणे आहे की, सदर मंजूरी पत्राच्या वैधतेचा कालावधी उलटून गेलेला असल्याने दरम्यानच्या काळात सदर पाणीपुरवठा संस्थेस विज पुरवठा केला गेला नसल्याने सदरची मंजूरी संपुष्टात आलेली असल्याने सदर पाणी पुरवठा संस्थेस इतर ग्राहकांची संमती घेऊन नव्याने अर्ज सादर करण्यास सांगण्यात आलेले आहे.वि.प. कंपनीच्या हया म्हणण्यातून गृहीतरित्या असे सूचित होते की, सदर पाणी संस्थेस त्या एक्सप्रेस फिडर लाईन वरुन वीजपुरवठा मंजूर करतेवेळी DDF ग्राहकाची मंजूरी घेण्यात आलेली नव्हती. ही बाब निर्विवाद आहे की, सदर मंजूरी पत्राची वैधता , त्याचा कालावधी संपल्यामुळे संपुष्टात आलेली आहे व ती मंजूरी आता अस्तित्वात नाही . त्यामुळे सदर मंजूरीच्या कायदेशीर किंवा बेकायदेशीर असण्याबाबतचे विवेचन , हे केवळ Academic Discussion ठरणार आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

मा. राज्य विद्युत नियामक आयोगाने केस क्र. ५६/२००७ मधील दिनांक १६.०२.२००८ रोजीच्या आपल्या आदेशात Dedicated Distribution Facility या शब्दाच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( विज पुरवठा संहिता व पुरवठया इतर शर्ती ) विनियम २००५ मधील कलम २.१.( g ) मध्ये दिलेल्या व्याख्येचे विवेचन करताना असे नमूद केलेले आहे की, सदर व्याख्ये वरुन अशा वाहिनीची Extension किंवा Tapping of existing हे Dedicated Distribution Facility या सदरात मोडत नाही. वितरण प्रणालीमध्ये Dedicated Distribution facility म्हणजे रोहित्रापासून किंवा उपकेंद्रापासून किंवा Switching Station पासून एखादया विविक्षित ग्राहकाकरता किंवा विविक्षित ग्राहकाच्या समुहाकरता काढण्यात आलेली एक स्वतंत्र विद्युत वाहिनी असते. अशी स्वतंत्र Dedicated Distribution Facility ही भविष्यात इतर कोणत्याही ग्राहकाला वापरता येत नाही. मुळ ग्राहक किंवा विविक्षित ग्राहकांचा समुह Dedicated Distribution Facility वरुन विज पुरवठा घेतो त्याच्यावर नवीन ग्राहक थोपविता येत नाही . सदर विनियमातील कलम ३.३.५ चा आधार घेत मा. राज्य आयोगाने त्या निकाला असेही स्पष्ट केलेले आहे की, ज्या वेळेला अशी स्वतंत्र विज वाहिनी उभी करण्याकरिता लागणारा-या यंत्रेणेचा खर्च ग्राहकांने केला असेल तर विज पुरवठा करार समाप्त होतेवेळी किंवा विज पुरवठा कायम स्वरुपी खंडीत करतेवेळी सदरची संपूर्ण यंत्रणा ही ग्राहकांची राहिल. याचा अर्थ असा झाला ज्यावेळेला Dedicated Distribution Facility योजने खाली जर एक्सप्रेस फिडर वरुन विज पुरवठा ग्राहकाला करण्यात आला असेल आणि त्याला लागणारा यंत्रेणेचा खर्च ग्राहकाने केला असेल तर सदर यंत्रणा विविक्षित ग्राहक किंवा ग्राहकांच्या मालकीची असते व त्यावरील इतर कोणाही ग्राहकाला विज पुरवठा देता येत नाही कधीच देता येत नाही. जर मुळ ग्राहकाने किंवा ग्राहकांनी अशा नवीन विज पुरवठयाला जर संमती दिली असेल तर गोष्ट वेगळी असते अशा पर्रिस्थितीत DDF वाहिनी वरील मुळ ग्राहकांची संमती घऊन नवीन वीज पुरवठा करता येऊ शकतो ही कायदेशीर बाब उशीरा का होईना विज वितरण कंपनीच्या निर्दशनास आल्याचे दिसते आणि त्यामुळेच आपल्या दिनांक १७.०२.२०१८ च्या क्रमांक अ.अ./को.मं./मां./उ.का.अ./१७३० या पत्र अन्वये तक्रारदार व इतर ग्राहक यांची पूर्वमंजूरी घेऊन सदर फिडर लाईनवरुन वीज पुरवठा मिळण्याकरता नवीन अर्ज दाखल करण्याची सूचना सदर महादेव स्वामी पाणी पुरवठा संस्थेत देण्यात आल्याचे दिसते ही बाब निर्विवाद आहे की अद्याप पावेतो दिनांक २९.०१.२०१६ चे पत्रानुसार महादेव स्वामी पाणी पुरवठा सस्थेस सदर वीज वाहिनी वरुन विज पुरवठा प्रत्यक्षारित्या जोडून दिलेला नव्हता आणि नाही त्यामुळे कायदयाचे वर केलले विवेचन हे केवळ तांत्रिक चर्चेचे विषय ठरलेले आहे.वास्तिक पाहता प्रस्तुत तक्रार अर्जाचा वाद विषय कधीच संपलेला आहे. ही बाब तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे यांच्या निर्दशनास आणली असता त्यांनी सदर मंजूरी आदेश मुलतः बेकायदेशीर आहे असे या मंचाकडून जाहिर होऊन मिळणे आवश्यक आहे असे आग्रहाने प्रतिपादन केले तसेच सदर बेकायदेशीर कृत्यामुळे जो मानसिक त्रास तक्रारदाराना झाला त्याबद्दल नुकसान भरपाई देण्याचे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आणि त्याकरिता प्रस्तुत तक्रार निर्णित करावी असे प्रतिपादन केले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

ही बाब जरुर आहे की, तक्रारदाराच्या एक्सप्रेस फिडर वरन त्रयस्थ अर्जदारास मंजूर करणारा आदेश आज अस्तित्वात नाही आणि सदर अर्जदारास मुळ ग्राहकाची संमती घेऊन नव्याने, विज पुरवठा करण्याकरिता अर्ज दाखल करण्याचे सूचित करण्यात आलेले आहे. परंतु त्यामुळे मुळ मंजूरी आदेशांची बेकायदेशीरिता नष्ट होत नाही. त्या हद्दीपर्यन्त _तक्रार मंजूर करता येईल पण तक्रारदाराला झालेल्या कथित मानिसिक त्रासापोटी जी नुकसान भरपाई मागणी तक्रारदारातर्फे करण्यात आलेली आहे त्याचा विचार वेगवेगळया दृष्टीकोणातून करणे आवश्यक आहे असे या मंचाचे मत आहे. यांचा विशेष उल्लेख करणे गरजेचे आहे तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केलेली होती कोणत्याही कलमा खाली नुकसान भरपाईची मागणी केल्याचे दिसत नाही. कक्षाने आपल्या आदेशात अशा नुकसान भरपाईच्या मागणीचा उल्लेख केलेला नाही त्यामुळे नुकसान भरपाईची मागणी प्रथमतः या मंचासमोर करण्यात आल्याचे दिसते. जो दिवाणी दावा , तक्रारदारानी जयसिंगपूर येथील दिवाणी न्यायालयात दाखल केलेला होता त्या दाव्यातील वाद पत्रामध्ये देखिल तक्रारदारानी कोणतेही नुकसान भरपाईची मागणी केलेली नव्हती. केवळ DDF एक्सप्रेस फिडर वरुन नवीन ग्राहकास त्याची संमती न घेता नवीन विजपुरवठा मंजूर केला म्हणून तक्रारदाराना मानसिक त्रास झाला हे केवळ सापेक्षे गोष्ट आहे व ती तक्रारदाराची मानसिकता आहे. ज्या अर्थी तक्रारादारानी सुसंगतरित्या, संधी असताना आधिच्या न्यायालयासमोर किंवा कक्षा समोर नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही आणि नव्याने या मंचासमोर केलेली आहे, त्या अर्थी ती मागणी अतांत्रिक आहे असे या मंचाचे मत आहे सबब नुकसान भरपाई मागणी मंजूर करता येत नाही असे मंचाचे स्पष्ट मत आहे सबब प्रस्तुत तक्रार ही अशतःमंजूर करावी लागेल असा या मंचाचा निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आम्ही खालील आदेश पारित करित आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) महादेव स्वामी पाणी पुरवठा संस्था याना, तक्रारदारांच्या DDF एक्सप्रेस फिडर लाईन वरुन विज पुरवठा मंजूर करणारे मंजूरी पत्र क्र. SE(KC)/T/HT/LIS/Shri Mahadev SPPM/५११४ & ५११५ दिनांक २९.०६.२०१६ बेकायदेशीर असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

३) तक्रारदाराची नुकसान भरपाई मागणी अमान्य करण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

REDRESSAL FORUM, STATE ELECTRICITY DIST. महावितरण